# MT

Seat No.

2018 .... .... 1100

**MT - MARATHI (SECOND OR THIRD LANGUAGE) (M) - SEMI PRELIM - I - PAPER - VI**

**Time : 3 Hours** **(Model Answer Paper)** **Max. Marks : 100**

## विभाग १ – गद्य

उ.१ **अ. खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

(१) **आकृतिबंध पूर्ण करा.** **2**




(२) (i) **कारण शोधा.** **1**

पात्ररचना, चुरचुरीत संवाद आणि नाट्यमय घटना प्रसंग यांमुळे नाटक मराठी माणसाच्या हृदयात अढळ स्थान प्राप्त करते.

(ii) **चूक की बरोबर लिहा.** **1**

चूक

(३) **व्याकरण :**

(i) **खालील वाक्यातील काळ ओळखा.** **1**

भूतकाळ

(ii) **अधोरेखित शब्दाची जात ओळखा.** **1**

आणि - उभयान्वयी अव्यय

(४) **स्वमत :** **2**

साहित्यप्रकारातील 'नाटक' हा भाग म्हणजे विलक्षण आव्हानात्मक असतो. नाट्यसंहिता लिहिण्यापासून ते थेट रंगमंचापर्यंतचा नाटकाचा प्रवास हा विविधांगी असतो. उत्कृष्ट लेखन, उत्कृष्ट दिग्दर्शन व उत्कृष्ट अभिनय यावर नाटकाचे यश अवलंबून असते. नाटकात काम करणारे कलाकार शब्दांना मूर्तरूप देतात.

प्रेक्षकांच्या मनावर पकड करतात. संवादफेक, शब्दांचे उच्चार, आवाजातील चढ उतार, नाटकाचा आशय व त्यातून समाजाला मिळणारा संदेश याची जबाबदारी कलाकारावर असते. कलाकार त्या भूमिकेत मनापासून शिरल्याखेरीज ती भूमिका प्रभावी होत नाही. नाटक कलाकाराच्या रोमारोमांत भिनलेले असते. म्हणून नाटक कलाकाराची सर्वांगीण प्रगती करते व त्याला घडवते.

उ.१ **आ. खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

(१) **आकृतिबंध पूर्ण करा.**

(i) **नाल्याच्या पलीकडून आलेला आवाज** → ''ऑऽव्हऽऽ'' 1

(ii) **पाण्यात काहीतरी पडल्याचा आवाज** → 'धपकन' 1

(२) (i) **एका वाक्यात उत्तर लिहा.** 1

शिकारीला जाण्यापूर्वी वाघिणीने पिल्लांना नाल्याकाठच्या जांभळीच्या दाट झुडपात लपविले होते.

(ii) **कंसातील योग्य शब्द वापरून रिकामी जागा भरा.** 1

<u>आईच्याभोवती</u> जबरदस्त दंगाधोपा सुरू झाला.

(३) **व्याकरण :**

**खालील तक्ता पूर्ण करा.** 2

| क्र. | शब्द | सामान्यरूप | विभक्ती प्रत्यय |
|---|---|---|---|
| (i) | **भक्षकांना** | भक्षकां | ना |
| (ii) | **वाघिणीचा** | वाघिणी | चा |

(४) **स्वमत :** 2

वाघ हा जंगलात राहणारा मांसाहारी सस्तन पशू आहे. हा भूतान, नेपाळ, भारत, कोरिया, अफगाणिस्तान व इंडोनेशिया मध्ये जास्त संख्येने आढळतो. लाल, पिवळ्या पट्ट्यांचे याचे शरीर असून पायाकडचा भाग पांढरा असतो. त्याचे वैज्ञानिक नाव 'पँथेरा टिग्रिस' आहे. संस्कृत मध्ये 'व्याघ्र' असे संबोधले जाते. दाट वनांत, दलदलीच्या भागात रहाणारा हा प्राणी आहे. सांबर, म्हैस, हरणे यांच्यावर झडप घालून तो शिकार करतो. वाघीण साडेतीन महिन्यानंतर साधारणत: दोन ते तीन पिल्लांना जन्म देते. ही पिल्ले शिकार करण्याची कला आपल्या आईकडून म्हणजे वाघिणीकडून शिकतात. साधारणपणे १ ९ वर्षांचे आयुर्मान यांना लाभलेले असते

## अपठित गद्य

**उ.१ इ. खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

**(१) खालील कृती पूर्ण करा.**

(i) **यांच्या पायावर एक कुटुंब निर्माण करणे मनुष्यत्वाचे ध्येय आहे.** — 1

→ स्वातंत्र्य
→ समता

(ii) **सर्व मानवांना परमेश्वराने दिलेले स्वातंत्र्य** — 1

→ धार्मिक
→ राजकीय

**(२) उत्तरे लिहा.**

(i) ऐहिक जीवनाचा, विश्वातील वस्तूंचा यथेच्छ उपभोग घेणे. — 1

(ii) शेतकी, कला, कौशल्य, मजूरी — 1

**(३) व्याकरण :**

**खालील तक्ता पूर्ण करा.** — 2

| शब्द | मूळ शब्द | प्रत्यय | सामान्यरूप |
|---|---|---|---|
| **परमेश्वराने** | परमेश्वर | ने | परमेश्वरा |
| **मानवांना** | मानव | ना | मानवां |

**(४) स्वमत :** — 2

संविधानाने भारतातील प्रत्येक नागरिकास स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, राष्ट्रप्रेम इत्यादी हक्क दिले आहेत. मनुष्याने त्या हक्कांचा वापर स्वत:चा स्वार्थ पूर्ण करून घेण्यासाठी करू नये. आपल्या हक्कांचा वापर करून कोणाचे नुकसान करू नये. भारतदेशाची अखंडता टिकावी, धार्मिक सलोखा अखंड राहावा, सर्वांनी समाधानाने आणि एकत्वाने येथे नांदावे अशा करीता आपल्या हक्काचा वापर मनुष्याने करावा.

मनुष्याला सुख प्राप्त व्हावे. कोणावरही अन्याय होऊ नये, प्रत्येकाच्या गरजा भागाव्यात, प्रत्येकाला समान वागणूक मिळावी यासाठीच तर भारतीय राज्य घटनेने आपल्याला समान हक्क दिले आहेत. त्या हक्कांची पायमल्ली होणार नाही याची दक्षता सर्वांनी घ्यावी. एक सुजाण, जबाबदार नागरिक बनावे.

**विभाग २ – पद्य**

उ.२ **अ. खालील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

(१) **(i) कसं ते पूर्ण करा.** 1

| |
|---|
| **यावर आमुचा अधिकार आहे.** |
| ↓ |
| देशाच्या मातीवर |

**(ii) कंसातील योग्य शब्द वापरून रिकामी जागा भरा.** 1

फुलामुलांतून हसतो **श्रावण** मातीचे हो मंगल तनमन.

(२) **काव्यपंक्तीचा योग्य क्रम लावा.** 2

(i) शेतामधुनी पिकवू मोती, धन हे अपरंपार।।
(ii) आभाळावर उत्क्रांतीचा घुमवू या ललकार।।
(iii) घराघरांतून जन्म घेतसे तेज नवा अवतार।।
(iv) भविष्य उज्ज्वल या देशाचे करूया जयजयकार।।

(३) 'स्वप्न करू साकार' या कवितेत श्री. किशोर पाठक यांनी 'एकजूटीचे सामर्थ्य' हे मूल्य मनात रूजविण्याचा सुंदर प्रयत्न केला आहे. कोणतेही काम एकट्याने करून पूर्ण होत नाही. घरी तयार होणाऱ्या अन्नपदार्थांसाठी अगदी शेतकरी दादा पासून, दुकानदार, कामगार, वाहतूक या सर्व घटकांची मदत आवश्यक असते. तसेच देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी एकजूटीने काम करणे तितकेच महत्त्वाचे आहे. 2

'हजार आम्ही एकी बळकट, सर्वांचे हो एकच मनगट' या पंक्तीवरून सिद्ध होते की, देशाची जनता एकत्र आली तर मनगटात बळकटी येईल व प्रगती शक्य होईल. सर्वांची शक्ति पणाला लावून कृषि व उद्योग यामध्ये उत्क्रांती होईल. या मातीवर जसा सर्वांचा अधिकार आहे, तसाच सर्वांनी मिळून मिसळूनच नव्या युगाचे स्वप्न साकारायचे आहे. भारताची संस्कृती व परंपरा थोर आहे, पण ती जपून वाढवायची आहे. हे एकजूटीने साध्य होणार आहे. साऱ्या विश्वात एकजुटीने भारताचा जयजयकार करायचा आहे.

(४) **खालील पंक्तींमधून सूचित होणारा अर्थ लिहा.** 2

इथे जन्माला येणारे प्रत्येक बाळ तेजस्वी व प्रबळ असेल. देशाचे रक्षण करण्यासाठी, नवीन कार्यासाठी घराघरातून जणू नवी पिढी जन्म घेईल आणि आपल्या शक्तीतून, आपल्या कार्यातून आपल्या विजयाचा अवतार साऱ्या जगासमोर उभा करेल. म्हणजेच सामर्थ्यशाली बालके जन्मास येऊन देशाचे भविष्य नक्कीच उज्ज्वल करतील, असा एक आशावाद कवीने येथे मांडलेला आहे.

उ.२ **आ. खालील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

(१) **(i) खालील प्रश्नाचे उत्तर एका वाक्यात लिहा.** 1

जेव्हा मुठीमध्ये द्रव्य नसते तसेच जेव्हा शिरेमध्ये रक्त नसते, तेव्हा कष्टाचे सामर्थ्य अपुरे वाटते.

| | | |
|---|---|---|
| | **(ii) कंसातील योग्य शब्द वापरून रिकामी जागा भरा.**<br>तुझ्या शौर्यगाथेपुढे, त्याची केवढीशी <u>**शान**</u>. | **1** |
| (२) | **योग्य पर्याय निवडा.**<br>(i) सैनिकाचे औक्षण कसे केले जाते <u>**डोळ्यांतील आसवांच्या ज्योतींनी**</u><br>(ii) कवितेतील 'दीन दुबळे' म्हणजे <u>**सैनिकांच्या कार्याचा अभिमान बाळगणारे देशवासीय.**</u> | <br>**1**<br>**1** |
| (३) | देशाच्या सीमेचे रक्षण करणारा सैनिक नेहमीच देशासाठी भूषणास्पद असतो. त्याच्या देशरक्षणाच्या कर्तव्यामुळे देशातील नागरिक सुखाची झोप घेऊ शकतात. अन्यथा परकीय आक्रमण, लढाई या संकटांमुळे आपली सुरक्षितता धोक्यात आली असती. ऊन, पाऊस, थंडी याला सामोरे जाऊन 'देशरक्षण' हेच त्यांचे ध्येय असते. जीवावर उदार होऊन ते सीमेवर न डगमगता उभे असतात. त्यांचे कुटुंब, मुले-बाळे यांना ते महिनोंमहिने भेटत ही नाही. देशरक्षणाच्या कर्तव्यासाठी आप्त स्वकीयांनाही त्यांना भेटता येत नाही. देशरक्षणाच्या कर्तव्यासाठी आप्त स्वकीयांनाही त्यांना भेटता येत नाही. खाजगी आयुष्याचा, सुखांचा संपूर्ण त्याग करुन केवळ सीमेवर हे जवान देशरक्षणासाठी सज्ज असतात. | **2** |
| (४) | देश हाच देव समजून सैनिक देशाची सेवा करीत असतात. त्यांचे हे काम अतुलनीय आहे. अनेक महिने ते आपले घरदार, कुटुंब सोडून सीमेवर लढत असतात. ऊन, थंडी, पावसाची तमा न बाळगता देशासाठी प्राण अर्पण करायला तयार होतात. अशा वेळेस आम्ही त्यांच्या या गुणांचे कौतुक भेटकार्ड देऊन करु शकतो. १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनी त्यांना शुभेच्छा कार्ड पाठवू शकतो. रक्षाबंधनच्या दिवशी त्यांना राखी पाठवू शकतो. मकर संक्रांतीला सीमेवरच्या जवानांसाठी तीळगुळ पाठवून स्नेह प्रदर्शित करू शकतो. त्यांच्या शहरातील वा गावातील कुटुंबाकडे स्थळभेट देऊन त्यांच्या कुटुंबाची ख्याली-खुशाली विचारू शकतो, त्यांच्याशी प्रेमाचे अतुट नाते जोडू शकतो. | **2** |
| उ.२<br>(१) | **इ. खालील ओळींचे रसग्रहण करा.**<br>'हिरवंगार झाडासारखं' या कवितेत कवी जॉर्ज लोपीस यांनी आनंदी जीवन जगण्यासाठी झाडांचे सर्व गुण आपल्या अंगी बाणवावेत, झाडांसारखे हिरवेगार ताजे, प्रफुल्लत राहावे असा संदेश दिला आहे.<br>आनंदी जीवन जगण्यासाठी आपण झाडाचा आदर्श घ्यावा, असे कवी 'जॉर्ज लोपीस' आपल्याला पटवून देत आहेत. ते म्हणतात की, झाड अचल असते. ते एका ठिकाणी काहीही न बोलता अढळ उभे असते. ऋषीमुनी जसे तपश्चर्येला ध्यान लावून बसतात. त्याचप्रमाणे झाड देखील मौन व्रतात उभे असते. बाह्य गोष्टींच्या सर्व परिणामांना ते बिनतक्रार सहन करत असते. पक्षी येतात-जातात, झाडांच्या मुळांवरही कधी कधी घाव बसतात. पानझड होते तरी झाड स्थिर व सहनशील असते. कठीण प्रसंगातही पाय घट्ट रोवून ध्यानस्थ ऋषिसारखे शांत असते. आपणही तोच मार्ग अनुसरला पाहिजे.<br>उपमा अलंकाराचे सुरेख उपाययोजना करून झाडाला ध्यानस्थ ऋषींची उपमा दिली आहे. त्यामुळे काव्यसौंदर्य निर्माण झाले आहे. शांत रसाची अनुभूती या दोन काव्यपंक्तीतून जाणवते. ही मुक्तछंदाची कविता विचार करण्यास प्रवृत्त करते. 'व्रत' हा पारंपारिक शब्द योजला आहे. | **4** |

## विभाग ३ – स्थूलवाचन

उ.३. **खालील कोणत्याही दोन कृती सोडवा.**

(१) **खालील मुद्द्यांवर एक परिच्छेद तयार करा. (७ ते ८ वाक्यांत)** 3

१९३८ साली मुंबई येथे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन भरले होते. स्वातंत्र्यवीर सावरकर या संमेलनाचे अध्यक्ष होते. 'व्युत्पत्ती कोश रचनेचे कार्य हाती घ्यावे' असा ठराव संमेलनात मंजूर करण्यात आला. सर्वांच्या मतानुसार हे कार्य कृ.पा.कुलकर्णी यांच्यावर सोपविण्यात आले. बॅ. मुकुंदराव जयकर यांच्या आर्थिक सहकार्यामुळे व श्री. दाजीसाहेब तुळजापूरकर यांनी पुरस्कृत केल्यामुळे व्युत्पत्ती कोश निर्मितीस भरीव मदत झाली. तसेच सर्वांच्या सहकार्यामुळे १९४६ साली 'मराठी व्युत्पत्ती कोशाचे' पहिले प्रकाशन झाले.

(२) **कुठल्याही दोन भाषा बोलणारे भाषिक जेव्हा एकमेकांच्या संपर्कात येतात, तेव्हा त्यांच्या भाषांतील शब्दांची देवाणघेवाण होते. त्यावरून शब्द तयार होतात ते लिहा.** 3

**तक्ता पूर्ण करा.**

| **भाषा** | **मूळ शब्द** | **मराठी शब्द** |
|---|---|---|
| संस्कृत | **तुण्ड** | तोंड |
| कन्नड | तुप्प | **तूप** |
| अरबी | **इत्र** | अत्तर |

(३) वाळवंटी प्रदेशात वर्षातून एखादाच पाऊस पडतो. कधी तर दोन-दोन, तीन-तीन वर्षे पावसाचा ठिकाणा नसतो, एरवी तेथे वाळवंटात सूर्य आग ओकत असतो. हवा तापलेली असते. सूर्याच्या आगीमध्ये पाने, फुले, गवत करपून जातात. वाळवंटात ओसाड, भकास जीवन असते. पण पावसाची वाट पहात बियांच्या रूपाने मातीत पडून रहायचे हा कॅक्टसचा गुणधर्म असतो. कॅक्टस अवर्षणाचा प्रतिकार करणारा आहे. जे काही पाणी मिळेल तेवढे स्वत:मध्ये साठवून घ्यायचे आणि कोरड्या हंगामात अगदी मंद गतीने वाढत रहायचे. अशी कॅक्टसची जगण्याची किमया असते. सग्वारो कॅक्टस तर २०० वर्षे जगतो. कॅक्टसमध्ये पाणी साठवण्याची रचना असते. मिळेल तेवढे पाणी तो साठवतो. त्याची सगळी अंगरचना पाणी साठवण्यासाठी बनलेली असते. पाऊस पडतो तेव्हा वाळवंटाची जमीन फारच थोडे पाणी शोषून घेते. त्यामुळे थोड्यावेळात पुष्कळ पाणी शोषून घेता येईल अशी कॅक्टसच्या मुळांची खास रचना असते. आपली मुळे लांब पसरवून भोवतालच्या जास्तीत जास्त क्षेत्रातील पाणी तो शोषून घेतो. झाडातले बरेचसे पाणी त्यांची पाने बाष्पीभवनाने गमावतात म्हणून कॅक्टसच्या झाडाने पान ही गोष्टच काढून टाकली आहे. म्हणूनच म्हटले आहे 'थोड्याशा पाण्यावर कसे वाढावे याचा नमुना म्हणजे कॅक्टस!'. 3

## विभाग ४ – भाषाभ्यास

उ.४ **(अ) भाषाभ्यासावर आधारित कृती**

(i) **समास** 2

**खालील तक्ता पूर्ण करा.**

| अ.क्र. | सामासिक शब्द | विग्रह | समासाचे नाव |
|---|---|---|---|
| (i) | **पंधरवडा** | पंधरा दिवसांचा समुह | द्विगू समास |
| (ii) | **सुंठसाखर** | सुंठ व साखर | इतरेतर द्वंद्व समास |

(ii) **अलंकार** 2

**खालील उदाहरण कोणत्या अलंकाराचे आहे हे ओळखून त्याच अलंकाराचे दुसरे उदाहरण लिहा.**

संत म्हणति, 'सप्त पदे सहवासे सख्य साधुशी घडते ?

अनुप्रास अलंकार

उदा. पेटविले पाषाण पठारावरती शिवबांनी
गरिबांच्या गळ्यात गाजे संतांची वाणी.

(iii) **वाक्यरूपांतर**

**कंसातील सूचनेप्रमाणे वाक्य परिवर्तन करून लिहा.**

१. तुझ्या शाळेत मराठी दिन साजरा कर. 1

२. किती आवडेल मला तुमच्याशी मैत्री करायला! 1

(iv) **सामान्यरूप**

**कंसात दिलेल्या शब्दांचे सामान्यरूप करून वाक्ये पुन्हा लिहा.**

१. दसऱ्याचा सण सर्वांना आनंद देतो. 1

२. एका महिन्यात सर्पदंशाने दोघांचा मृत्यू झाला. 1

(v) **वाक्प्रचार**

**कंसातील वाक्प्रचारांचा योग्य उपयोग करून वाक्ये पुन्हा लिहा.**

१. पावसाळ्यातील इंद्रधनुष्याने माझ्या मनावर **किमया केली.** 1

२. श्रावण बाळाची गोष्ट ऐकताना मुले-मुली **देहभान विसरली.** 1

उ.४ **(ब) स्वाध्यायावर आधारित कृती.**

(१) **शब्दसंपत्ती** 1

(i) **समानार्थी शब्द लिहा.**

१. निकटवर्ती - जवळचा २. म्हातारा - वृद्ध

| | | |
|---|---|---|
| (ii) | **विरुद्धार्थी शब्द लिहा.**<br>१. हसणे × रडणे     २. मृदू × कठोर | 1 |
| (iii) | **खालील शब्दसमूहासाठी एक शब्द लिहा.**<br>देवावर विश्वास असणारा - आस्तिक | 1 |
| (iv) | **एका शब्दाचे भिन्न अर्थ लिहा.**<br>शिक्षा ← दंड → बाहू | 1 |
| (२) | **लेखननियमांनुसार लेखन** | |
| (i) | **अचूक शब्द ओळखून लिहा.**<br>१. निर्मिती     २. कुलूप | 1 |
| (ii) | **खालील वाक्ये लेखननियमानुसार शुद्ध करून लिहा.**<br>तिच्या डोळ्यांतला **क्रोध** त्याच्या **परिचयाचा** होता. | 1 |
| (३) | **विरामचिन्हे**<br>**खालील वाक्यातील चुकीची विरामचिन्हे बदलून लिहा.**<br>१. माझ्या आई-वडिलांना वाय. एम. सी. ए. मधील खेळाडूंकडून माझ्या खेळाबाबत स्तुतीपर उद्‌गार ऐकू येऊ लागले होते.<br>२. त्यांच्या 'विशाखा' या काव्यसंग्रहाला मानाचा 'ज्ञानपीठ' पुरस्कार मिळाला. | 2 |
| (४) | **पारिभाषिक शब्द**<br>**खालील शब्दांना पारिभाषिक शब्द लिहा.**<br>१. Tax - कर     २. Exhibition - प्रदर्शन | 1 |
| (५) | **भाषिक खेळ**<br>**खालील शब्द अकारविल्हेनुसार लावा.**<br>गरुड, चिमणी, फुलपाखरू, भुंगा | 1 |

## विभाग ५ – उपयोजित लेखन

उ.५ (१) **अ. खालील कृती सोडवा.** 5

**पत्रलेखन**

**खालील जाहिरात वाचा व संबंधितांस मागणी पत्र लिहा.**

दिनांक - २७ जानेवारी, २०१८

प्रति,
मा. व्यवस्थापक,
ज्ञानसागर ग्रंथ भांडार,
महात्मा गांधी रोड, दादर (प.),
मुंबई - ४०० ०२८.

**विषय** : शालेय ग्रंथालयासाठी पुस्तकांची मागणी.

माननीय महोदय,

सप्रेम नमस्कार.

मी अ. ब. क., 'सरस्वती विद्यालय' या शाळेतील विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने मुख्याध्यापकांच्या संमतीने हे पत्र लिहीत आहे. आमच्या शाळेच्या ग्रंथालयासाठी खालील पुस्तकांची आवश्यकता आहे. तरी कृपया ती पुस्तके शाळेच्या पत्त्यावर त्वरीत पाठवून द्यावीत. सोबत पुस्तकांचे देयक (बिल) पाठवावे. जेणेकरून पुस्तकांची रक्कम त्वरीत देण्याची व्यवस्था करता येईल.

**पुस्तकांची यादी पुढीलप्रमाणे :**

| क्र. | पुस्तकाचे नाव | लेखकाचे नाव | प्रती |
|---|---|---|---|
| (i) | शिवछत्रपती | श्री. बाबासाहेब पुरंदरे | ०५ |
| (ii) | बटाट्याची चाळ | पु. ल. देशपांडे | १० |
| (iii) | स्वामी | रणजित देसाई | ०७ |
| (iv) | यश तुमच्या हातात | शिव खेरा | ०५ |

वरील पुस्तके विद्यार्थ्यांसाठी असल्यामुळे कृपया पुस्तकांवर योग्य ती सवलत द्यावी, ही नम्र विनंती.

कळावे, तसदीबद्दल क्षमस्व.

आपला विश्वासू,
अ. ब. क.
(विद्यार्थी प्रतिनिधी)
सरस्वती विद्यालय,
जोगेश्वरी (प.),
मुंबई

(२) **सारांश लेखन** 5

**खालील उतारा वाचा व त्याचा एकतृतीयांश एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.**

'पोळा' हा शेतकऱ्यांच्या जीवनातला महत्त्वाचा सण असतो. आयुष्यभर बैलांच्या ज्या खांद्यावर जू ठेवला जातो. त्या खांद्यांची शेतकरी मालीश करतो. घरदार खास सजवले जाते. बैलांना सजवून त्यांची पूजा केली जाते. 'पोळा' या सणाच्या दिवसापासून पाऊस थोडा कमी होऊ लागतो.

उ.५ **आ. खालील कृती सोडवा.**

(१) **जाहिरात लेखन** 6

**खालील शब्दांचा वापर करून जाहिरात तयार करा.**

**संपली परीक्षा। संपली शाळा। आता फक्त खेळा।**

**चलो बॅग भरो व निकल पडो**

# राका बॅग्ज

प्रवासातला तुमचा खरा व विश्वासू साथी - राका बॅग्ज

'राका बॅग म्हणजे - मजबूत, टिकावू, दर्जेदार आणि विविध रंगात व आकारात मिळणाऱ्या बॅगा.

रास्त भाव व विक्रीनंतरही तत्पर सेवा यांचे दुसरे नाव - राका बॅग्ज

**मॉल व मोठ्या दुकानात उपलब्ध**

'राका बॅग्ज' सुपरमार्केट, लाला रोड, वडाळा (पूर्व)

दूरध्वनी :- ४६२८७१००

**ग्राहकांची सेवा व समाधान हेच आमचे ध्येय**

(२) **कथा लेखन** 6

**खालील अपूर्ण कथा पूर्ण करून लिहा. दिलेली कथा लिहून घेण्याची आवश्यकता नाही.**

**लोभी माणूस**

रामपूर गावामध्ये सोहनलाल नावाचा एक सावकार राहत होता. तो अतिशय लोभी होता. सोन्याची तर त्याला विशेष आवड होती. एके दिवशी गावात एका साधूचे प्रवचन होते. प्रवचनात साधुमहाराजांनी सांगितले की, 'आपण जर मनापासून परमेश्वराची भक्ती केली तर परमेश्वर आपल्या सर्व इच्छा पूर्ण करतो.' सोहनलाल हे ऐकून खूपच खूश झाला. त्या दिवसापासूनच परमेश्वराची भक्ती करू लागला. दिवस रात्र अगदी मनापासून परमेश्वराच्या भक्तीत तो रंगून जाऊ लागला असे बरेच दिवस निघून गेले.

याची भक्ती पाहून एके दिवशी परमेश्वर त्याच्यावर प्रसन्न झाला. परमेश्वराने त्याला दर्शन दिले आणि

सांगितले, ''माग तुला काय हवे ते?'' परमेश्वराचे हे शब्द ऐकताच सोहनलालचा लोभीपणा जागृत झाला. आणि तो परमेश्वराला म्हणाला, ''माझ्या झोळीत भरपूर सोन्याची नाणी टाक''. परमेश्वराने त्याची मागणी मान्य करताना त्यास सांगितले, ''नाणी जर जमिनीवर पडली तर त्याची माती होईल.'' लोभीपणामुळे सोहनलालने त्याकडे लक्ष दिले नाही.

परमेश्वर सोहनलालच्या झोळीत सोन्याची नाणी टाकू लागला. हळूहळू संपूर्ण झोळी सोन्याच्या नाण्यांनी भरून गेली. तरीही सोहनलाल देवाला 'मला अजून सोन्याची नाणी दे', असे सांगत होता आणि अचानक सोन्याची नाणी झोळीत जास्त झाल्याने झोळी फाटली आणि सर्व नाणी जमिनीवर पडून त्यांची माती झाली. हे पाहताच सोहनलालला अतिशय दु:ख झाले आणि त्याचवेळेला परमेश्वरही अंतर्धान पावले.

उ.५ **इ. लेखनकौशल्य**

**खालील लेखनप्रकारांपैकी कोणतीही एक कृती सोडवा. (१०० ते१२० शब्द)**

(१) **फळ्याचे आत्मवृत्त ....** ८

फार फार वर्षापूर्वीची गोष्ट आहे. त्यावेळी मनुष्याने आजच्या सारखे शोध लावले नव्हते. तो नुसती भाषा शिकला होता. पण लिहिण्याची कला त्याला अवगत नव्हती. पण मनुष्यप्राणी जात्याच हुशार त्याने दगडावर दगड घासून अग्नी निर्माण करण्यापासून ते संगणकापर्यंत अनेक शोध लावले. प्रारंभी तो पानांवर लिहित होता नंतर दगडावर लिहू लागला व शेवटी त्याने मला जन्म दिला. मी रंगाने काळा कुरूप पण जगात रंगापेक्षा गुणांना अधिक महत्त्व असते. मी रोज तुमच्या समोर असतो ओळखलंत का मला? मी तुमच्या वर्गातला फळा.

होय! मी तुझ्यासमोर असणारा, निर्जीव असा फळाच बोलतो आहे. गेले कित्येक दिवस मला कुणाशी तरी बोलायचे होते, स्वत:च्या भावभावना, सुखदु:ख सांगून मन हलके करायचे होते. पण कुणीही माझ्याशी बोलत नव्हते. आज माझा आवाज तुझ्या मनाच्या गाभाऱ्यापर्यंत पोहोचला याचा मला आनंद आहे. आज मी तुम्हाला माझ्या मनातील सगळे विचार सांगणार आहे.

तुमच्या शाळेत गेले कित्येक वर्षापासून माझं वास्तव्य आहे. तुमच्या अगोदरच्या अनेक विद्यार्थ्यांच्या पिढ्या माझ्यासमोर मोठ्या होताना मी पहिल्या आहेत. अरे, हो! मला आजही आठवतो तो दिवस. ज्यावेळी पहिल्यांदा मला तुमच्या शाळेत आणलं व माझं स्वागत केलं. एका दुकानात मला एका खोलीत कोंडून ठेवलं होतं. जिवाचा किती कोंडमारा व्हायचा. कधी मुक्त होऊन आपण तिथून जाऊ असं वाटायचं व कधी कधी तर आपण कुणा दुष्ट व्यक्तीच्या हाती लागलो तर....! आपल्याला असेच कोंडून ठेवले तर...! याचीही भीती वाटायची. पण तुमच्या शाळेत मी आलो आणि माझे जीवन कृतकृत्य झाल्यासारखे मला वाटले. माझ्या जन्माचे ते खरेखुरे सार्थक होते. 'फळा' हा शिक्षकाचा खरा मित्र असतो, असे म्हणतात. याची जाणीवही मला येथेच येऊन झाली. कितीतरी शिक्षकांचा, विद्यार्थ्यांच्या प्रेमळ हाताचा स्पर्श मला लाभला आहे. ज्या गोष्टी तुम्हाला तोंडी समजत नाही. त्या समजावण्यासाठी शिक्षक माझा आधार घेतात. एवढेच नव्हे तर सुंदर आकृत्या, रंगबेरंगी खडू, चित्र यांच्या माध्यमातून नेहमीच माझे सुशोभिकरण चालूच असते. शिक्षक ज्या ज्या गोष्टींचा शैक्षणिक साधन म्हणून वापर करतात. त्यात माझा समावेश निश्चितच होतो. विद्यार्थी रोज चांगले विचार रोजच्या घडामोडी लिहितात व इतरांचे ज्ञानभंडार वाढवितात.

शाळेत कोणताही कार्यक्रम असो किंवा कोणतीही महत्त्वाची सूचना असो माझा वापर निश्चितपणे केलाच जातो. काही विद्यार्थी तर सदैव लिहायला उत्सुक असतात. नाना प्रकारच्या गमतीजमती ते माझ्या अंगावर लिहून करत असतात. शाळा कुठलीही असो, लहान वा मोठी आमची जागा निश्चितच असते. वेगवेगळ्या संस्थांमधूनही आमचा वापर होतो. विद्यार्थी व शिक्षक यांचे माझ्याशी व माझे त्यांच्याशी अतूट असे नाते आहे. ते सदैव माझ्याजवळ असतात. त्यामुळे एकटेपणाची जाणीव मला बोचत नाहीत. संध्याकाळ झाली की तुम्ही सगळे दूर जाता तेव्हा मी अतिशय आर्ततेने सकाळ होण्याची वाट पाहतो.

काळाबरोबर, बदलत्या वेळेनुसार आमचे रंगरूपही बदलले आहे. आता ग्रीनबोर्ड, ग्लासबोर्ड अशा आधुनिक रूपातही आम्ही काही ठिकाणी दिसतो. पण मला हे माझे विठ्ठलासारखे काळे स्वरूपच अधिक भावते. आजच्या या तांत्रिक, वैज्ञानिक युगात अनेक नवनवीन प्रयोग होत असले तरी माझे महत्त्व, माझी ओळख अबाधित आहे. एवढ्या वर्षांनंतर आजही मी तसाच वटवृक्षासारखा पाय रोवून भक्कम उभा आहे. खेडेगावातल्या शाळेमध्ये आजही शिक्षणातील अनेक सोयीसुविधा उपलब्ध नाहीत. तेथे आमचा वापर, उपयोग अधिकच चांगल्याप्रकारे होतो. चला तर! आता तुमचीही घरी जाण्याची वेळ झाली आहे. आपण पुन्हा कधीतरी निश्चित बोलूया व अनेक गमतीजमती, मनातल्या गोष्टी मी तुम्हाला सांगेन.

(२) **शाळा बंद झाल्या तर ...** **४**

'ही आवडते मज मनापासून शाळा,
लाविते लळा जसा माऊली बाळा ....'

खरंच! शाळेचे महत्त्व बालपणापासूनच आपल्या जीवनात श्रेष्ठच ठरलेलं आहे. ज्या वयात आपली स्वत:ची आपल्याला संपूर्ण ओळख झालेली नसते त्या वयातच शाळेतले शिक्षक आपल्याला समाजात सन्मानाने कसे जगता येईल याचे पाठ आपल्याकडून गिरवून घेतात. मग हळूहळू आपण आपली ओळख समाजाला करून देतो. कुंभार ज्याप्रमाणे मातीच्या गोळ्याला घटाचा सुंदर आकार देतो. तसाच आपल्या जीवनाचे शिल्पकार हे शिक्षक आपल्याला घडविण्याचे कार्य ज्या कार्यशाळेत करतात ती वास्तू म्हणजे 'शाळा'!

सत्यम्, शिवम्, सुंदरम्.... या प्रार्थनेपासून शाळा सुरू होते आणि मग प्रत्येक वर्गात ज्ञान दानाचे कार्य सुरू होते. कधी भाषा, कधी विज्ञान, कधी गणित या सर्वच विषयांची गोडी विद्यार्थ्यांना वर्गात लावण्याचा कसोशीने प्रयत्न केला जातो, या प्रक्रियेत विद्यार्थी आपोआपच घडत जातो. वेगवेगळ्या आर्थिक स्तरातले, विविध भाषी विद्यार्थी जेव्हा शाळेच्या ठराविक गणवेषात वर्गात बसतात, शिकतात तेव्हाच त्यांच्यात एक सलोख्याचे नाते तयार होते. गणवेष या सा-यांना एका समान पातळीवर आणतो. या गणवेषाने सर्व भेद मनाच्या बाहेर पळतात व मैत्रीचे नवे ऋणानुबंध जुळतात. हे स्नेहाचे बंध पुढे आयुष्यात पदोपदी आपल्याला शालेय जीवनाच्या मधुर स्मृतीत घेऊन जातात.

कधीकधी अभ्यासाचा कंटाळा येतो वाटतं या शाळा बंद व्हाव्यात. पण हा विचार क्षणिकच येतो. कारण लगेच या विचारांचे दुष्परिणाम जाणवू लागतात. शाळा बंद झाल्या तर जीवनात संस्कार, शिक्षण, आपुलकी यापैकी काहीच राहणार नाही. कारण सहजीवनाचे खरे पाठ आपल्याला शालेय जीवनातच मिळतात ना ! ते सारे संस्कार दुरावतील व शिक्षणाशिवाय माणूस पशुतुल्य होईल. समाजात सर्वत्र हाहा:कार माजेल. जीवनातले प्रेम नाहिसे होईल. मैत्रीचे संबंध दुरावतील आणि विशेष म्हणजे शाळेत दिल्या जाणाऱ्या ज्ञानानेच

मानवी जीवन सुंदर व सुसंस्कृत होते ते होणार नाही. माणसांची सामाजिकताच नष्ट होईल. विचारांची देवाणघेवाण जर झाली नाही तर सारा समाज स्वार्थी व एकलकोंडा होईल. मग काय सर्वत्र फक्त स्वार्थच उरेल. शाळेत मिळणाऱ्या ज्ञानाने फक्त व्यक्तिमत्व विकासच होत नाही तर देशाचाही विकास होतो. भारत माझा देश आहे. ही प्रतिज्ञा नसानसांत भिनते. इतिहासाच्या गाढ्या अभ्यासाने देशभक्तांच्या प्रेरणादायी जीवनाने मनात राष्ट्रीयतेची भावना जागते.

म्हणजेच शाळा बंद झाल्या तर .... हा विचार मनोरंजनासाठी बरा वाटतो. वास्तवात हाच विचार आत्मघातकी वाटतो म्हणून तो सोडून दिलेलाच बरा ....

‘शाळा म्हणजे आनंद, ज्ञानाचा सुगंध
फुलते जीवन आपुले, जेव्हा लागतो हा छंद’

❖❖❖❖❖